दि.15/04/2015 पूर्वी बंधपत्रित आरोग्य सेविका म्हणून कार्यरत असलेल्या आरोग्य सेविका यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून बंधपत्रित आरोग्य सेविका म्हणून 11 महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/ 417 /2026
दिनांक 08/03/2026

वाचा – 1. मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण/प्र.क्र.169/आस्था-12 दिनांक 09 डिसेंबर 2022
2. या कार्यालयाकडील पत्र क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/0522/142/2022 दिनांक 31/03/2022
3. मा.अवरसचिव,महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.169/आस्था-12 दि.05 एप्रिल 2022
4. या कार्यालयाकडील पत्र क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/0522/301/2022 दिनांक 27/04/2022
5. मा.अवरसचिव,महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.169/आस्था-12 दिनांक 28 जून 2022
6. या कार्यालयाकडील पत्र क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/621/2022 दिनांक 02/08/2022
7. या कार्यालयाकडील आदेश क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/204/2023 दिनांक 10/04/2023
8. या कार्यालयाकडील आदेश क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/209/2023 दिनांक 12/04/2023
9. या कार्यालयाकडील आदेश क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/823/2023 दिनांक 28/11/2023
10. या कार्यालयाकडील आदेश क्र.आरोग्य/कार्या-2/आस्था-4/564/2023 दिनांक 06/09/2023
11. कार्यालयीन आदेश क्र. आरोग्य/कार्या-2/आस्था-4/254/2024 दिनांक 15/03/2024
12. महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक वेपुर-1125/प्र.क्र.01/सेवा-9 दिनांक 02 जून 2025

संदर्भ क्रमांक 1 अन्वये दिनांक 15/04/2015 पूर्वी बंधपत्रित म्हणून कार्यरत असलेल्या 24 आरोग्य सेविका यांना जिल्हा परिषदेतील रिक्त पदावर बंधपत्रित आरोग्य सेविका म्हणून तात्पुरत्या स्वरुपात सामावून घेणेस मान्यता देणेत आलेली आहे. संदर्भ क्रमांक 7,8 व 9 अन्वये एकूण 24 बंधपत्रित आरोग्य सेविकांना जिल्हा परिषद अधिनस्त रिक्त पदावर बंधपत्रित आरोग्य सेविका म्हणून तात्पुरत्या स्वरुपात सामावून घेणेत आले आहे. संदर्भ क्रमांक 10 अन्वये सदर बंधपत्रित आरोग्य सेविका यांना 11 महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात सामावून घेणेचे आदेश निर्गत केले आहेत.

संदर्भ क्रमांक 11 अन्वये 11 महिन्याची तात्पुरती सेवा संपुष्टात आल्यानंतर आरोग्य सेवेची निकड विचारात घेता खाली नमुद बंधपत्रित आरोग्य सेविकांचा 11 महिने कालावधी संपल्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून पुनःश्च तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक देणेस मान्यता दिली आहे.

नमुद केलेल्या उमेदवारांना जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-3) (आरोग्य) श्रेणी-3 (सहाय्यक परिचारिका प्रसाविका) आरोग्य सेवक महिला या पदावर वेतन मॅट्रीक्स **एस-09 26400-83600** या वेतनसंरचनेत अधिक नियमानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता व इतर भत्ते यामध्ये रिक्त पदावर 11 महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देवून त्यांची नेमणुक जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी संदर्भ क्रमांक 7, 8 व 9 मधील आदेशाच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | पदस्थापनेचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण | तांत्रिक खंड दिल्याचा दिनांक | तात्पुरती नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | उषा गोरक्षनाथ उरुडे मु.पो.सोनई,ता.नेवासा जि. अहिल्यानगर | खुला | उपकेंद्र ब्राम्हणी, प्रा.आ.केंद्र उंबरे, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर | 13.01.2026 | दि.14.01.2026 ते दि.13.12.2026 |
| 2 | कमल सदाशिव ढेपे मु.पो.सोनगांव,ता.जामखेड, जि. अहिल्यानगर | खुला | उपकेंद्र साकत, प्रा.आ.केंद्र नान्नज, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर | 13.01.2026 | दि.14.01.2026 ते दि.13.12.2026 |
| 3 | सुमित्रा भिमाजी कवाद मु.पो.निघोज,ता.पारनेर, जि. अहिल्यानगर | खुला | उपकेंद्र लोणीमावळा,प्रा.आ.केंद्र अळकुटी,ता.पारनेर, जि. अहिल्यानगर | 14.01.2026 | दि.15.01.2026 ते दि.14.12.2026 |
| 4 | आशा एकनाथ निचीत मु.पो.निघोज,ता.पारनेर, जि. अहिल्यानगर | खुला | उपकेंद्र पाडळीआळे,प्रा.आ.केंद्र अळकुटी, ता.पारनेर, जि. अहिल्यानगर | 15.01.2026 | दि.16.01.2026 ते दि.15.12.2026 |
| 5 | जयश्री माणीक कराड मु.पो.येळी,ता.पाथर्डी जि. अहिल्यानगर | खुला | उपकेंद्र खरवंडी (कासार) प्रा.आ.केंद्र खरवंडीकासार, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर | 15.01.2026 | दि.16.01.2026 ते दि.15.12.2026 |
| 6 | शांता रामदास शिरसाठ मु.करोडी,पो.चिंचपूरइजदे ता.पाथर्डी जि. अहिल्यानगर | खुला | उपकेंद्र माणिकदौंडी, प्रा.आ.केंद्र माणिकदौंडी,ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर | 13.01.2026 | दि.14.01.2026 ते दि.13.12.2026 |
| 7 | सोनाली बाळासाहेब मरकड रामनगर,पूर्वप्रकाश नगर, गट नंबर 3, औरंगाबाद जि.औरंगाबाद | खुला | उपकेंद्र बेलपिंपळगाव, प्रा.आ.केंद्र नेवासा बु. ता.नेवासा, जि.अहिल्यानगर | 14.01.2026 | दि.15.01.2026 ते दि.14.12.2026 |
| 8 | कल्पना रामदास जाधव मुळे कॉलनी,शाहुनगर,केडगांव, अहिल्यानगर 414001 | विजाअ | प्रा.आ.केंद्र टाकळीकाझी, ता.नगर, जि.अहिल्यानगर | 12.01.2026 | दि.13.01.2026 ते दि.12.12.2026 |
| 9 | उषा विठठल राठोड मु.पो.लाडजळगांव, ता.शेवगांव जि. अहिल्यानगर | विजाअ | उपकेंद्र कांबी,प्रा.आ.केंद्र हातगांव, ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर | 15.01.2026 | दि.16.01.2026 ते दि.15.12.2026 |
| 10 | शगुफता मुमताजअली सय्यद द्वारा कमलेश गरुड 351/2,विप्पषना केंद्रा जवळ माधवनगर,मनमाड, ता.नांदगांव,जि.नाशिक पि.423101 | इ.मा.व | उपकेंद्र सावळीविहिर, प्रा.आ.केंद्र सावळीविहिर,ता.राहाता, जि.अहिल्यानगर | 15.01.2026 | दि.16.01.2026 ते दि.15.12.2026 |

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | पदस्थापनेचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण | तांत्रिक खंड दिल्याचा दिनांक | तात्पुरती नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 11 | नलिनी दामोदर नवगिरे ऋतुगंधर्व,कॉटेज कॉर्नर, सावेडी, अहिल्यानगर | इ.मा.व | प्रा.आ.केंद्र देवळालीप्रवरा, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर | 14.01.2026 | दि.15.01.2026 ते दि.14.12.2026 |
| 12 | आशा बाळासाहेब काळे लक्ष्मीनगर म्हसोबा चौक, कोपरगांव ता.कोपरगांव, जि. अहिल्यानगर | इ.मा.व | उपकेंद्र चासनळी,प्रा.आ.केंद्र चासनळी, ता.कोपरगांव, जि. अहिल्यानगर | 14.01.2026 | दि.15.01.2026 ते दि.14.12.2026 |
| 13 | रुक्मीणी बबनराव हाडदे टेलीफोन ऑफीस जवळ, समर्थनगर,भूम ता.भूम, जि. उस्मानाबाद पिन 413508 | वि.मा.प्र | उपकेंद्र सोनेगांव, प्रा.आ.केंद्र खर्डा, ता.जामखेड, जि. अहिल्यानगर | 17.01.2026 | दि.18.01.2026 ते दि.17.12.2026 |

उपरोक्त उमेदवाराची पदस्थापना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

1. उमेदवाराची नेमणुक ही 11 महिने कालावधीसाठी अथवा पदभरती किंवा इतर मार्गाने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात राहील.
2. उमेदवाराची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असेल.
3. उमेदवारास जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा दयावयाचा असल्यास एक महिना पूर्व नोटीस दयावी लागेल अथवा एक महिन्याचे मूळ वेतन जिल्हा परिषद निधीत /शासन खाती जमा करावे लागेल.
4. संबंधित उमेदवार यांनी नेमणुकीच्या ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.
5. उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग दिनांक 28 मार्च 2005 अणि शासन परिपत्रक दिनांक 1 जुलै 2005 मधील नमुद महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटुबाचे प्रतिज्ञापत्र) मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने रुजू होतांना दिनांक **28/03/2005** रोजी नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या नमुद करुन हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28/03/2005 चे तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे उमेदवार आरोग्य सेविका या पदासाठी अपात्र ठरणार आहे, असे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.
6. प्रस्तुत प्रकरणी नेमणुक कालावधी संदर्भात संदर्भ क्रमांक 6 अन्वये शासनाकडून मार्गदर्शन मागविणेत आलेले आहे. सदर मार्गदर्शनास अधिन राहून सदरची नेमणुक देणेत येत आहे.
7. सदर आदेशाने नेमणुक दिल्यानंतर महाराष्ट्र शासन किंवा मा.न्यायालय यांचेकडून निर्देश प्राप्त झालेस अगर सदयस्थितीत नेमणुकी बाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नेमणुकीच्या वेळी नेमणुकीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नेमणुक कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रदद करण्यात येईल. याबाबत अपील अर्ज करता येणार नाही. तसेच कोणत्याही मा.न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही.
8. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता कोणत्याही टप्प्यावर तपासण्यात येईल. त्यावेळी त्याची शैक्षणिक अर्हतेमध्ये अपात्र असल्याचे आढळून आल्यास उमेदवाराची नेमणुक कोणत्याही टप्प्यावर रदद करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.
9. सदरची नेमणुक ही आदेशाच्या दिनांकापासून देणेत येत असून त्यानुसार उमदेवार प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासूनच त्यांना सेवाविषयक लाभ अनुज्ञेय राहतील. उमेदवाराचा यापूर्वीचा बंधपत्रित कालावधी कोणत्याही सेवाविषयक लाभासाठी ग्राहय धरला जाणार नाही.
10. उपरोक्त बंधपत्रित आरोग्य सेविका यांनी नेमणुकीच्या मुख्यालयी वास्तव्य करुन राहणे बंधनकारक राहिल.
11. उमेदवाराने नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यापूर्वी खालीलप्रमाणे लेखी प्रमाणपत्र रु. 200/- (अक्षरी रुपये दोनशे फक्त) च्या स्टँप पेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

मला जिल्हा सेवा (वर्ग-3) (तांत्रिक) मध्ये बंधपत्रित आरोग्य सेविका या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक दिली आहे. या संबंधी मी दिलेल्या पुरक कागदपत्रानुसार माहिती खरी आहे. सदरची माहिती खोटी निघाल्यास

Scanned with OKEN Scanner

माझी सेवा आपणाकडून समाप्त करण्यात येईल याची मला जाणीव करून देण्यात आलेली आहे व ते मला मान्य आहे. तसेच माझे समावेशन हे तात्पुरत्या स्वरुपात असून मला कोणतेही कारण न दाखवता व कोणतीही पूर्व सूचना न देता सेवेतून कमी करावे लागेल हे मी गृहीत धरून नोकरी स्वीकारली आहे. तसेच आदेशामधील 1 ते 11 अटी व शर्ती मला मान्य आहे.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या **www.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 20260308100037 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 08-03-2026 17:07:41
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,
श्रीमती -----------------------

प्रत -1. वैदयकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र------------तालुका -------------- जिल्हा अहिल्यानगर
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
3. गट विकास अधिकारी,पंचायत समिती -------------
4. तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती -----------------------

**स्वाक्षरी xxx**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

Scanned with OKEN Scanner